# घटक ४ राज्यघटनेचा सरनामा

⇒ राज्यघटनेच्या सुरुवातीला सरनामा असलेली अमेरिकन राज्यघटना पहिली.

⇒ सरनामा म्हणजे राज्यघटनेची प्रस्तावना किंवा प्रारंभिक माहिती.

एन.ए. पालखीवाला → 'सरनामा हे राज्यघटनेचे ओळखपत्र'

⇒ घटनेचा सरनामा १३ डिसे ४६ ला मांडलेल्या व २२ जाने ४७ ला मान्य झालेल्या (पं. नेहरू) उद्दिष्टांच्या ठरावावर आधारित.

→ ४२ व्या घटना दुरुस्तीने (प्रथमच) सरनाम्यात समाजवादी, धर्मनिरपेक्ष व एकात्मता - या ३ शब्दांचा समावेश

सरनामा :

"आम्ही भारतीय जनता, भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडविण्याचा आणि त्यांच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता;

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधान सभेत आज दिनांक २६ नोव्हें १९४९ रोजी याद्वारे हे संविधान स्वीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

सरनाम्याचे घटक :

① राज्यघटनेच्या अधिकाराचा स्त्रोत : अधिकार भारतीय जनतेकडून मिळाले आहेत.
② भारतीय राष्ट्राचे स्वरूप : सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक
③ राज्यघटनेची उद्दिष्टे : न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता
④ स्वीकृती दिनांक : २६ नोव्हें १९४९

महत्त्वाच्या संज्ञा

सार्वभौम :

* सार्वभौम असणे म्हणजे कोणत्याही देशावर अवलंबून नसणे किंवा कोणत्याही देशाची वसाहत नसणे म्हणजेच स्वतंत्र राष्ट्र असणे. (भारताने १९४५ साली युनोचे व १९४९ साली राष्ट्रकुल गटाचे सदस्यत्व घेतल्याने सार्वभौमत्वावर परिणाम झालेला नाही)

* सार्वभौम असल्याने भारत दुसऱ्या देशाचे क्षेत्र अधिगृहीत करू शकतो किंवा आपले क्षेत्र दुसऱ्या देशाला देवू शकतो.

समाजवादी → शब्द १९७६ साली समाविष्ट

* सन १९५५ मध्ये काँग्रेस पक्षाने आपल्या आवडी येथील अधिवेशनात 'समाजवादी प्रणालीची समाजरचना' स्विकारण्याचा ठराव केला.

Scanned by CamScanner

समाजवादाचे दोन प्रकार

① साम्यवादी समाजवाद : सर्व उत्पादन साधनांचे व वितरण व्यवस्थेचे राष्ट्रीयीकरण, खाजगी मालमत्ता रद्द.

② लोकशाही समाजवाद : मिश्र अर्थव्यवस्था - सार्व. क्षेत्र व खाजगी क्षेत्र - सहअस्तित्व.

* भारतीय समाजवाद हा मार्क्सवाद व गांधीवाद यांचा मिलाफ - गांधीवादाकडे झुकलेला.

धर्मनिरपेक्ष : शब्द १९७६ साली समाविष्ट झाला असला तरी.

- घटनेत २५ ते २८ ही धार्मिक स्वातंत्र्याची अधिकाराची हमी देणारी कलमे अगोदरच समाविष्ट होती.
- कोणताही धर्म हा राज्यघटनेचा मुलाधार असणार नाही.

- नास्तिक राज्ये ⟶ धर्मविरोधी - सर्व धर्मांचा धिक्कार करतात.
- ईश्वरसत्ताक राज्ये ⟶ धर्मानुकुल - विशिष्ट धर्म राज्याचा धर्म असतो उदा. बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका, म्यानमार
- धर्मनिरपेक्ष ⟹ धर्माच्या मुद्यावर तटस्थ - उदा. भारत, अमेरिका.

लोकशाही

* सर्वात श्रेष्ठ अधिकार जनतेकडे.

* प्रकार दोन - ① प्रत्यक्ष ⟹ लोक त्यांचा अधिकार प्रत्यक्षरित्या बजावतात उदा. स्वित्झर्लंड

मार्ग चार - (i) सार्वमत : लोकांचे मत घेणे

(ii) पुढाकार : कायदा करण्यासाठी लोकांनी पुढाकार घेणे.

(iii) परत बोलाविणे : प्रतिनिधी अयोग्य - पदावरून हटविणे

(iv) सार्वत्रिक मतदान : प्रत्यक्ष मतदान.

② अप्रत्यक्ष ⟹ लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी सर्वश्रेष्ठ अधिकार बजावतात सरकार चालवतात व कायदे करतात. उदा. भारत.

या प्रकारास प्रातिनिधीक लोकशाही असेही म्हणतात.

त्याचे प्रकार 2 - ① संसदीय - भारत

② अध्यक्षीय - अमेरीका

* सरनाम्यातील लोकशाही हा शब्द ⟶ राजकीय, सामाजिक, आर्थिक लोकशाही सूचित करतो.

प्रजासत्ताक :

लोकशाही - दोन प्रकार.

① राजसत्ताक : राष्ट्रप्रमुख - वंशपरंपरागत

② प्रजासत्ताक : राष्ट्रप्रमुख : प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या निवडला जातो उदा. अमेरीका, भारत

* प्रजासत्ताक पद्धतीमध्ये सर्व सार्वजनिक पदे सर्व नागरिकांसाठी खुली असतात. देश चालविण्याच्या प्रक्रियेत कोणताही व्यक्ती योग्यतेनुसार सहभागी होऊ शकतो. म्हणजेच राजकीय सार्वभौमत्व जनतेकडे असते

Scanned by CamScanner

② केशवानंद भारती खटला (१९७३) केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य सरकार
अगोदरचे मत नाकारले.
सरनामा हा राज्यघटनेचा भाग आहे असे म्हटले.

③ भारतीय जीवन बीमा निगम खटला (१९९५) विरुद्ध कंझ्युमर एज्युकेशन व रिसर्च सेंटर
सरनामा हा राज्यघटनेचा एक भाग आहे असे म्हटले.

सरनाम्यात दुरुस्ती करता येते का ?

कलम ३६८ अंतर्गत दुरुस्ती करता येते का हा प्रश्न केशवानंद भारती खटल्यात उपस्थित झाला. त्यावेळी सरनामा हा घटनेचा भाग असल्याने दुरुस्ती करता येईल पण घटनेची मुलभूत चौकट किंवा मुलभूत संरचना बदलता येणार नाही. म्हणजेच ३६८ अंतर्गत मुळ वैशिष्ट्ये किंवा मूळ घटक बदलता येणार नाही.

## घटक ५ - संघ आणि त्याचे क्षेत्र

⇒ राज्यघटनेतील कलम १ ते कलम ४ ही संघ व त्याचे क्षेत्र यांच्याशी संबंधित.

कलम १ - इंडिया म्हणजेच भारत राज्यांचा संघ असेल.
म्हणजेच देशालाही इंडिया व भारत ही दोन्ही नावे स्विकारली.
तसेच संघराज्य शब्दाचा उल्लेख न करता राज्यांचा संघ असे म्हटले आहे.

राज्यांचा संघ म्हणण्यामागे दोन कारणे.
① अमेरिकी संघराज्याप्रमाणे भारत हा राज्यांतील करारानुसार बनलेला नाही.
② भारतात राज्यांना संघराज्या पासून वेगळे होण्याचा अधिकार नाही.

या कलम १ अनुसार भारताच्या क्षेत्राचे ३ प्रकारात वर्गीकरण :
① राज्यांची क्षेत्रे
② संघराज्य प्रदेश
③ भारत - सरकारने मिळविलेली क्षेत्रे.

⇒ घटनेच्या परिशिष्ट १ मध्ये राज्यांची व संघराज्य प्रदेशांची नावे व त्यांचा क्षेत्रीय विस्तार दिला आहे.
राज्यासंबंधीच्या घटनेतील तरतुदी जम्मू व काश्मीरला लागू होत नाही.

⇒ राज्यांचा संघ यामध्ये फक्त राज्यांचा समावेश तर
भारताच्या क्षेत्रात राज्यांबरोबरच, संघराज्य प्रदेश व भविष्यात सरकार मिळविल त्या क्षेत्राचा समावेश
म्हणून भारताचे क्षेत्र ही संज्ञा राज्यांचा संघ यापेक्षा व्यापक
राज्ये ही संघराज्यीय प्रणालीची सदस्य असतात - अधिकार विभागलेले असतात - केंद्र व राज्य
मात्र संघराज्य प्रदेश किंवा भविष्यातील प्रदेश संघराज्यीय प्रणालीची सदस्य नसतात कारण
ती थेट केंद्राकडून प्रशासित होतात

Scanned by CamScanner